# <u>प्रेस नोट</u>

महाळुंगे पोलीस चौकी
दिनांक ०६/०२/२०२१

## अंधाराचा फायदा घेवुन कंपनी कामगारास लुटणारे ०६ लुटारु जेरबंद
## महाळुंगे पोलिस व गुन्हे शाखा क्राईम युनिट ३ यांची संयुक्तिक कामगिरी

---

**मौजे खराबवाडी, ता खेड जि पुणे** येथील **मॅट्रिक्स हॉटेल जवळ चाकण तळेगाव रोडने जाणारे श्री अनिल मारुतराव शिंगणापुरे हे** दि २०/०१/२०२१ रोजी रात्रौ १२:३० वा चे सुमारास कंपनी मधुन सुट्टी झालेवर मोटार सायकल वरुन घरी जात असताना त्यांना ६ अज्ञात चोरटयांनी अडवुन त्यांचेकडील रोख रक्कम व मोबाईल फोन असा १५,१५०/रु चा ऐवज लुटला होता. त्याबाबत महाळुंगे पोलीस चौकी येथे गुन्हा रजि.नंबर १००/२०२१ भा.द.वि.कलम ३९७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये फिर्यादीस अडवुन त्यांचेकडील १५,१५०/रु ऐवज लुटणारे लुटारु बाबत काहीएक उपयुक्त माहीती प्राप्त नसताना गुन्हे शाखेच्या क्राईम युनिट ३ चे अधिकारी व स्टाफचे मदतीने तांत्रिक गोष्टींचे आधारे व गोपनिय बातमीदार मार्फत मिळालेल्या बातमीचे आधारे ०३ संशयीत व्यक्तिस ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी गुन्हयाचे कबुल केले. त्यांचेकडे तपास करुन त्यांचे इतर ३ साथीदारांना अटक केली आहे.

**अटक आरोपीं नामे -**

१) **रवी दादु ठाकर** वय २४ वर्षे, रा-ठाकरवस्ती , रासे, ता खेड जि पुणे
२) **योगेश नाथु मेंगाळ** वय २३ वर्षे, रा- सदर
३) **धनेश फकीर ठाकर** वय २२ वर्षे, रा- सदर
४) **लक्ष्मण कैलास मेंगाळ** वय २० वर्षे, रा- सदर
५) **निखील सखाराम मेंगाळ** वय २५ वर्षे, रा- सदर
६) **समीर भिकाजी जाधव** वय २६ वर्षे, रा-ठाकरवस्ती, रेटवडी, ता खेड जि पुणे

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.कृष्ण प्रकाश,** मा.अपर पोलीस आयुक्त श्री **रामनाथ पोकळे,** मा पोलीस उप आयुक्त(गुन्हे) **श्री सुधीर हिरेमठ**, मा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ - **श्री मंचक इप्पर,** सहाय्यक पोलीस आयुक्त **श्री राम जाधव**, महाळुगे पोलीस चौकीचे पोलीस निरीक्षक **अरविंद पवार** व क्राईम युनिट ३ चे पोलीस निरीक्षक **शंकर बाबर** यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक **सारंग चव्हाण,** पोलीस उपनिरीक्षक **गिरीष चामले** पोलीस फौजदार **तात्या टोपे, मधुकर पानसरे,** पोलीस हवालदार **प्रकाश नवले, ज्ञानेदव आटोळे, श्रीधन इचके, किरण सांगळे, आणि** क्राईम युनिट ३ चे पोलीस हवालदार **कोळेकर, ढाकणे, नांगरे** यांनी केली आहे.




पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय